**नि. फौ. खं. क्र. ४००/२०२३** **सरकार वि. निशांम**

**नि.०५**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – विष्णु शिवदास कांबळी

वय – ४६ वर्ष, धंदा –सेक्युरीटी गार्ड

पत्ता – पीएनडी कॉलनी, रनाळा

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. जुमळे यांचे कडून सुरु</u>**

दिनांक १९.०७.२०२३ रोजी माझी नाईट ड्युटी होती. दिनांक २०.०७.२०२३ रोजी सकाळी ६.४५ मिनीटांनी उपजिल्हा रुग्णालय हॉस्टीपलच्या मागिल बाजुस आवाज आला. त्यावेळी मी डिलेव्हरी वार्ड समोरील गेटवर होतो. म्हणून मी आवाजाच्या दिशेने इसीजी रूमकडे गेलो. मी लॉक उघडले परंतु तो पर्यंत ते इसम पळून गेले होते. काही लोक दवाखान्याच्या आवारातून पाण्याचे पाईप वगैरे घेवून पळाले होते. लोखंडी नळाची तोटी, कपलींग व पाईपचे तुकडे इत्यादी साहित्य चोरी गेल्याचे दिसून आले म्हणून मी अधिका-यांना सांगितले. त्यानंतर मी दिनांक २२.०७.२०२३ रोजी फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि.क्र.०६</u>** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>नि. क्र.०७</u>** देण्यात येत आहे. नि.क्र.०६ व ०७ वर माझ्या सहीच्या खाली दिनांक २३.०७.२०२३ अशी चुकुन टाकली आहे. चोरीस गेलेल्या वस्तु मी पाहिल्यास ओळखू शकतो. पोलीस घटनास्थळी आले होते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री पंकज यादव तर्फे.</u>**

मी चार वर्षापासून नोकरीस आहे. माझे शिक्षण पदवी पर्यंत झाले आहे. माझी नोकरी निमशासकीय आहे. हे म्हणणे खरे नाही की आमची भरती खाजगी कंत्राटदारामार्फत झाली आहे. एकुण चार सुरक्षा रक्षक नेकणुकीस असतात. आमची आलटून पालटून ड्युटी असते. हे म्हणणे खरे आहे की चोरी कोणी केली हे मी पाहिलेले नाही व मी त्यांना ओळखत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजुबाजुला भरपूर लोकांची घरे व वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळापासून पोलीस स्टेशन तीन ते चार मिनीटाच्या अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की अधिका-यांच्या सांगण्यावरून मी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की नळ व पाईप हे वेगवेगळ्या कंपनीचे असतात. हे म्हणणे खरे आहे की ते दुकानात सहज उपलब्ध असतात व एकसारखे

असतात. हे म्हणणे खरे नाही की अधिका-यांच्या सांगण्यावरून खोटी फिर्याद दाखल करून आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.** श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी **(सागर एस. जाधव)**

**दिनांक – ०१/०७/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**

**नि. फौ. खं. क्र. ४००/२०२३** **सरकार वि. निशाम**

**नि.०८**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.०२ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सुरज दिनेश कनोजीया

वय – ३२ वर्ष, धंदा – सेक्युरीटी गार्ड

पत्ता – घाटी हॉस्पीटल, हमालपुरा, कामठी

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. जुमळे यांचे कडून सुरु</u>**

दिनांक २२.०७.२०२३ रोजी पोलीसांनी मला उपजिल्हा रुग्णालय कामठीच्या मागिल बाजुस पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. पोलीसांनी तेथे पाहणी केली व वस्तुस्थितीप्रमाणे पंचनामा केला व पोलीसांनी तेथे नकाशा तयार केला. आता मला पंचनामा दाखविला. तो तोच आहे. त्यातील मकजूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **<u>नि.क्र.९</u>** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण**

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री पंकज यादव तर्फे.</u>**

माझे शिक्षण १२वी पास आहे. मी दोन वर्षापासून नोकरी करीत आहे. माझी नोकरी निमशासकीय आहे. हे म्हणणे खरे आहे की घटनास्थळाच्या आजुबाजुला भरपूर लोकांची घरे व वस्ती आहे. हे म्हणणे खरे आहे की उपजिल्हा रुग्णालय कामठी येथे इतर सुरक्षा रक्षक आहेत. आमच्या सर्वाची शिफ्टमध्ये ड्युटी असते. मला दिशेचे ज्ञान आहे. पंचनामा ०२.०० वाजता सुरु झाला व ३.०० वाजता संपला. मी घटनास्थळाच्या चतुःसिमा सांगू शकतो. मी पंचनामा वाचून पाहिला होता. हे म्हणणे खरे नाही की मी वरिष्ठांच्या सांगण्यावरून सही केली. हे म्हणणे खरे नाही की मी पंचनाम्यावर सही पोलीस ठाण्यात केली. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष कोणताही पंचनामा झाला नाही व मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.** श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी **(सागर एस. जाधव)**

**दिनांक – ०१/०७/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**

**नि. फौ. खं. क्र. ४००/२०२३** **सरकार वि. निशाम**

**नि.१०**

सरकारतर्फे साक्षीदार क्र.०३ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सुरेश राजेंद्र गधंरे

वय – ३९ वर्ष, धंदा – सेक्युरीटी गार्ड

पत्ता – रविदास नगर, कामठी

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. जुमळे यांचे कडून सुरु**

दिनांक ०९.०८.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले नव्हते. मी पोलीस ठाण्यात गेलो होतो तेथे पालीस ठाण्यात लोखंडी पाईप ठेवले होते. आता मला जप्ती पंचनामा दाखविला. तो तोच आहे. त्यातील मकजूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र.११** देण्यात येते.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षाने उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली**.

हे म्हणणे खरे नाही की दिनांक ०९.०८.२०२३ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या समक्ष पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातून वस्तु जप्त केल्या होत्या.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री पंकज यादव तर्फे.**

माझे शिक्षण १०वी पास इतके झाले आहे. मी चार वर्षापासून नोकरी करीत आहे. हे म्हणणे खरे आहे की मी जप्ती पंचनाम्यावर फक्त सही केली. हे म्हणणे खरे नाही की त्यातील मजकूर मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की विष्णु कांबळे यांच्या सांगण्यावरून मी सही केली. हे म्हणणे खरे आहे की माझ्या समक्ष काहीही जप्त झाले नाही.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास काही नाही.** श्रवणोत्तर स्वीकृत/समक्ष

स्वा/-

ठिकाण –कामठी **(सागर एस. जाधव)**

**दिनांक – ०१/०७/२०२४** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र. २, कामठी.**